**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १०१/२०१९** **दिनांक १७/१२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ११/१२/२०१९ ते १७/१२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/१२/२०१९ सकाळी ८:३० पासून २२/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/१२ | १२/१२ | १३/१२ | १४/१२ | १५/१२ | १६/१२ | १७/१२ | | १८/१२ | १९/१२ | २०/१२ | २१/१२ | २२/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३२.९ | ३२.५ | ३४.१ | ३५.४ | ३४.४ | - | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३२ | ३३ | ३३ | ३१ |
| २२.७ | २१.२ | २०.३ | १९.४ | १९.७ | २०.७ | - | किमान तापमान (अं.से) | २१ | २१ | २२ | २२ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ३ | २ | ६ | ७ |
| १०० | ९७ | ९९ | १०० | ८६ | ९८ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६७ | ६५ | ६२ | ६० | ५९ |
| ७७ | ७३ | ७८ | ७३ | ७९ | ७८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४३ | ३८ | ३७ | ३५ | ४० |
| २ | १ | ३ | ३ | ३ | २ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ७ | ६ | ४ | ४ |
| इ.उ. | आ. | इ.उ. | इ.पु. | इ.उ. | इ.उ. | - | वाऱ्याची दिशा | ई. | ई. | ई. | ई.पू. | पू. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १८ ते २२ डिसेंबर, २०१९ दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहील.**

**दिनांक १३ ते १९ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार ठाणे जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **वाल** | **वाढीची अवस्था** | • वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी प्रवाही डायमेथोएट ३० टक्के १२ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **आंबा** | **पालवी अवस्था** | • पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काजू** | **मोहोर अवस्था** | • मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. किड मोहोरातील रस शोषून घेते त्यामुळे मोहोर सुकून जातो. असून किडीच्या प्रादुर्भावामुळे मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशक लेबल क्लेम नाही) |
| **नारळ** | **-** | • किनारपट्टी भागामध्ये नारळ बागेत काळ्या डोक्याची अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असून किडीच्या अळ्या पानाच्या खालच्या भागावर जाळी तयार करून पानांतील हरितद्रव्य खाल्यामुळे पाने करपल्यासारखी दिसून येतात. किडीच्या नियंत्रणासाठी किडलेली पाने काढून नष्ट करावीत आणि १६ मि. ली. डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच किडीच्या जैविक नियंत्रणासाठी प्रति माड किडीच्या १२ अळ्या आढळून आल्यास गोनीओझस नेफटीडीस ह्या परोपजीवी किटकाची ३५०० प्रौढ कीटक प्रति हेक्टरी या प्रमाणात बागेत झावळ्यांवर सोडावेत. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | • केळी पिकामध्ये पर्णगुच्छ रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगग्रस्त झाडे मुनव्यासकट जमिनीतून समूळ उपटून नष्ट करावीत. पर्णगुच्छ रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होत असल्याने, किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच ०.०५ टक्के डायमिथोएट या कीटकनाशकाची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| **टोमेटो** | **वाढीची अवस्था** | • टोमेटो पिकास काठीचा आधार दयावा.<br>• टोमेटो पिकास प्रति एकरी क्षेत्रास ४३ किलो युरिया खताची मात्रा पुर्नलागवडीनंतर एका महिन्याने देण्यात यावी. |
| **वांगी** | **वाढीची अवस्था** | • वांगी पिकास प्रति एकरी क्षेत्रास ४३ किलो युरिया खताची मात्रा पुर्नलागवडीनंतर एका महिन्याने देण्यात यावी. |
| **झेंडू** | **वाढीची अवस्था** | • झेंडू फुलपिकामध्ये लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी खुरपणी करावी व रोपांना मातीची भर दयावी. |
| **ॲस्टर** | **वाढीची अवस्था** | • ॲस्टर फुलपिकामध्ये लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी खुरपणी करावी व रोपांना मातीची भर दयावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी कोमट व स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे व दिवसा गोठयाची दारे व खिडक्या खुली ठेवावीत जेणे करून हवा खेळती राहील. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**